Scholars World
INTERNATIONAL PEER REVIEWED REFEREED MULTIDISCIPLINARY JOURNAL OF CONTEMPORARY REASERCH
Impact Factor: 4.433
Online ISSN: 2320-3145, Print ISSN: 2319-5789

उच्च शिक्षणाद्वारे शाश्वत विकासातून जागरूकता

प्रा.यशवंत भगवंत जाधव

सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग
कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनवणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सटाणा. जि.नाशिक.

सारांश:

शाश्वत विकास करणे या युगात ही संकल्पना एक व्यापक व परिवर्तनात्मक सर्वसमावेश घटकांचा समावेश करण्यात आला. शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांनी एक महत्त्वाचा आकृतिबंध जगासमोर मांडलेला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमा'ने अलीकडेच सादर केलेल्या सर्वसमावेशक संपत्ती अहवाल २०१५ मध्ये विकासात्मक प्रगतीच्या शाश्वततेचे अधिक व्यापक मूल्यमापन करणाऱ्या पर्यायी नियंत्रक घटकांचा अवलंब केला जातो. यात मुख्य:ता गरीबी, उपासमार, आरोग्य, शिक्षण, हवामानातील बदल, लिंग समानता, पाणी, स्वच्छता, ऊर्जा, पर्यावरण व सामाजिक न्याय यांचा समतोल साध्य करण्यावर भर देण्यात येतो. या शाश्वत विकास ध्येयांमध्ये विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमधील फरक न करता,त्याऐवजी हे उदिष्ट्ये सर्व देशांना समान स्वरूपात लागू व ह्या सर्व उद्दिष्टांची पुर्तता २०३० व साध्य करणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शाश्वत विकासाशी संबधित अनेक भाग त्यांच्या घटकांचा अभ्यास करणे आवश्यकता आहे.

प्रस्तावना :

प्रस्तुत शोधनिबंधाच्या वर्तमानकाळातील गरजा पूर्ण करतांना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांचा विचार करणे म्हणजे शाश्वत विकास होय. सन १९८७ मध्ये पर्यावरण व विकास या वरील जागतिक समितीने ब्रुटलँड अहवालातून शाश्वत विकासाची आधुनिक संकल्पना मांडण्यात आली. पृथ्वीवरील साधन संपत्ती वापर करत असतांना पुढील पिढ्यांनीही संसाधनांचा वापर काटेकोरपणाने करणे अपेक्षित असते. विकास हा नैसर्गिक संसाधनांच्या वापरावर अवलंबून असतो. नैसर्गिक संसाधने निसर्गनिर्मित असून ती मर्यादित स्वरूपाचे उपलब्ध असतात. नैसर्गिक संसाधनांवर कोणत्याही एका विशिष्ट समाजाचे मालकीचा हक्क नसून ते संपूर्ण सजीव सृष्टीचे असते. तसेच ते केवळ एका पिढीपुरते मर्यादित नसून भविष्यातील पिढ्यांसाठी त्या नैसर्गिक संसाधनाचा वापर करू शकतो.

या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी २०१५ ते २०३० असा १५ वर्षांचा कालावधी निश्चित करण्यात आला असून, यामध्ये सर्वांसाठी समावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण सुनिश्चित करणे शैक्षणिक उद्दिष्ट महत्त्वाचे असून या उद्दिष्टांतर्गत एकूण दहा विविध लक्ष्ये निश्चित केले असून त्यांमध्ये गुणवत्तापूर्ण असे तंत्र, व्यावसायिक आणि विद्यापीठ स्तरावरील शिक्षण सुनिश्चित करणे; रोजगार व उद्योजकतेसाठी आवश्यक तांत्रिक व व्यावसायिक कौशल्य असलेले तरुण आणि प्रौढांच्या संख्येत लक्षणीय वाढ करणे; लिंग असमानता दूर करून समाजातील प्रत्येक असुरक्षित व्यक्तीला सर्व प्रकारचे शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षणात समान प्रवेश-संधी सुनिश्चित करून या गुणवत्ता पूर्वक शिक्षणाचा समावेश होतो.

संशोधन विषयाची उद्दिष्टे :- १) शाश्वत विकासाच्या अनुषंगाने ज्ञान आणि कौशल्यांचा आढावा घेणे.
२) उच्च शिक्षणाद्वारे शाश्वत विकासाचा अभ्यास करणे.
३) उच्च शिक्षणातील तंत्रज्ञानाचा वापरांचा अभ्यासणे.

संशोधनपद्धती :- प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी दुय्यम प्रकारच्या माहितीचा वापर केला आहे.प्रस्तुत शोध निबंधासाठी दैनिक वर्तमान पत्रातील लेख , संशोधन जर्नल्स, मासिके, संदर्भ ग्रंथ व इंटरनेट इत्यादीचा समावेश करण्यात आला आहे. उद्दिष्टे समोर ठेवून सामुग्री संकलित करून विश्लेषणात्मक पद्धती वापर करून शोध निंबधातील विषय स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

विषय विवेचन :-

शाश्वत विकासाच्या अनुषंगाने ज्ञान व कौशल्य

शाश्वत विकासासाठी पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक ज्ञान अत्यंत महत्त्वाचे आहे. या कौशल्यामध्ये
समस्या निवारण ,सहयोगी नेतृत्व,पर्यावरण शिक्षण, निर्णय घेण्याची क्षमता, सांघिक कार्य व जबाबदारी हरित तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत सक्षम गरज आहे .तसेच पर्यावरणीय ज्ञानामुळे व्यक्तीला नैसर्गिक संसाधनांचे महत्त्व आणि त्यांचे संरक्षण ह्या गोष्टीची जाणीव होत असते,आणि सामाजिक ज्ञानामुळे समाजातील समता, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय घटकांची पूर्तता करून त्याचप्रमाणे आर्थिक ज्ञानामुळे संसाधनांचा योग्य वापर आणि शाश्वत उत्पादन व उपभोग यावे . शाश्वत विकासासाठी काही महत्त्वाची कौशल्ये आवश्यकता असल्याने समस्या सोडवण्याची क्षमता, योग्य

निर्णय घेण्याची क्षमता, संशोधन व नवोपक्रम कौशल्ये आणि सहकार्य व नेतृत्व कौशल्ये यात प्रामुख्याने सर्वसमावेशक कौशल्यांमुळे व्यक्ती पर्यावरणीय आणि सामाजिक समस्यांचे विश्लेषण अभ्यास करून अजून नवीन कौशल्य विकसित करता येऊ शकतो . नवीन माहिती शिकण्यासाठी आवश्यक असलेल्या मेंदूच्या प्रक्रियांबद्दल शिकण्याची कौशल्ये, साक्षरता कौशल्ये, व सोशल माध्यमे आणि डिजिटल संसाधनांच्या वापराद्वारे नवीन ज्ञानाची निर्मिती आणि संपादन करण्यास मदत करतात.

२१ व्या शतकातील कौशल्यांचे व्यापक परिणाम आणि ते आजीवन शिकणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी शाश्वत विकास ध्येय साध्य करण्यासाठी जाणीव निर्माण करणे. समाजाच्या सर्वांगीण शिक्षणाद्वारे विकासात योगदान देऊ शकतात. त्यामुळे शाश्वत विकासासाठी शिक्षण, जागरूकता आणि व्यावहारिक कौशल्यांचा विकास अत्यंत महत्त्वाचा भाग मानला जात असतो.

उच्च शिक्षणाद्वारे शाश्वत विकासाचा अभ्यास

जागतिक शिक्षण हा अध्यापन आणि शिक्षणाचा एक आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन आहे जो विद्यार्थ्यांना जगभरात विविध शैक्षणिक आणि व्यावसायिक संधी प्रदान करतो. जागतिकीकरण होत असताना आणि जागतिक बाबी पूर्वीपेक्षा अधिक गुंतागुंतीच्या होत असताना, उच्च शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना प्रभावी जागतिक क्षमता असलेले तयार करणे अपेक्षित आहे. या दृष्टीने १९९२ च्या रीओ दे जानेरो येथील परिषदेत शाश्वत विकासासाठी शिक्षणाचा चार अंगानी विचार करण्यात आला. मूलभूत शिक्षणाचे उन्नयन व सुधारणा, शाश्वत विकासासाठी सर्व स्तरावरील शिक्षणाची पुनर्रचना, शाश्वत विकासाबाबत जनसामान्यामध्ये जाणीव जागृती व सामंजस्याचा विकास आणि प्रशिक्षण ह्या घटकांवर भर देण्यात आला. जागतिक स्पर्धा आणि संप्रेषण तंत्रज्ञानातील जलद गतीमुळे अधिक कुशल आणि सर्जनशील मनुष्यबळ अधिक उत्पादक असणे आवश्यक आहे.ज्ञानप्राप्ती किंवा ज्ञानसंग्रह, ज्ञानविश्लेषण, ज्ञानव्यवस्थापन आणि जीवनाच्या व जगाच्या विविध क्षेत्रांत संपादित ज्ञानाचा उपयोग करणे, अशी कौशल्ये शिक्षणातून व्यक्तीला मिळाली आवश्यक आहे.. केवळ बौद्धिक व पुस्तकी शिक्षणाने या सर्व गोष्टी मिळणार नाहीत, तर तंत्रविज्ञानातील नेत्रदीपक प्रगती आणि त्यातून निर्माण होणाऱ्या गरजा सदैव शोधत राहण्याची वृत्ती शिकणाऱ्याच्या मनात निर्माण करता आली पाहिजे. शिक्षणातून व्यक्तीच्या जीवनात निरंतर चालना मिळत असते. आज उद्योजकता, कौशल्य विकास आणि करिअर नियोजनात शाश्वततेला एकत्रित करणारे नाविन्यपूर्ण कार्यक्रम तयार करण्यात ICECD सारख्या संस्था भूमिका महत्त्वाची आहे .

उच्च शैक्षणिक संस्थांनी राष्ट्रांच्या आणि जागतिक समाजाच्या कल्याणावर परिणाम करणाऱ्या समस्या ओळखून आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी भूमिका साध्य यासाठी जनजागृती आणि अर्थव्यवस्थेतील खाजगी क्षेत्राचा सहभाग आवश्यक आहे. सार्वजनिक आणि खाजगी अशा दोन्ही शैक्षणिक संस्थांना त्यांची ध्येये आणि उद्दिष्टे पुन्हा परिभाषित करून आणि शाश्वत समाजाच्या गरजेनुसार प्राधान्यक्रम स्थापित करावे शकतील.

उच्च शिक्षणातील तंत्रज्ञानाचा वापरांचा अभ्यास

उच्च शिक्षणाच्या संदर्भात तंत्रज्ञानाचा वापर अनेक विद्याशाखांमध्ये सुरू झालेला आहे तंत्रज्ञानामुळे शिक्षणाची गुणवत्ता वाढली असून, विद्यार्थ्यांना ज्ञानस्रोतांच्या अमर्याद उपलब्धतेची सुलभता निर्माण झालेली आहे.आजच्या २१ शतकात तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षण अधिक प्रभावी, सुलभ आणि पर्यावरणपूरक दिसत आहे. त्यामुळे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तंत्रज्ञानाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी नवीन स्रोतांचा निर्माण होत असून त्याचे योग्य नियोजन आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्यास शिक्षण क्षेत्राचा आणि समाजाचा दीर्घकालीन विकास शक्य होतो. संशोधन हा तंत्रज्ञान विकासाचा पाया असतो. यासाठी वेगवेगळ्या शाखाच्या मदतीने भौतिक, रासायनिक व जैविक पद्धतीचा वापर सरसपणाने वापर सुरु आहे .मुळात उच्च शिक्षणातील गुणवत्तेचा संबंध रोजंदारी देण्यायोग्य असे मनुष्यबळ तयार करण्याशी आहे. त्यांमुळे उच्च शिक्षणातील तंत्रज्ञान कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे. यासाठी उच्च शिक्षणाद्वारे आंतरविद्याशाखांचा विचारधारा पद्धतीचा अवलंब करावा आवश्यक आहे.

आज उच्च शिक्षणामुळे निर्माण होणारे संशोधन, नवकल्पना आणि नवीन तंत्रज्ञान अत्यंत समाजाच्या विकासासाठी हितकारक ठरत आहे. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नैसर्गिक संसाधनांचा अधिक कार्यक्षम पद्धतीने वापर आणि नवीन संसाधने सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि जलऊर्जा यांसारख्या नवीकरणीय ऊर्जेचा वापर केल्यामुळे प्रदूषण कमी करण्यास मदत होते. यामुळे उद्योग, शेती, आरोग्य आणि शिक्षण अनेक क्षेत्रांमध्ये उन्नती होतांना दिसत आहे. अत्यधुनिक तंत्रज्ञानामुळे श्रम व वेळेची बचत होऊन संसाधनांचा कार्यक्षम वापर होण्यास मदत होत असते.

प्रस्तूत शोधनिबंधाच्या अध्ययनातून स्पष्ट होते की देशातील अनेक राज्यांमध्ये भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात माहिती व तंत्रज्ञानाचा वापराची कार्यक्षमतेत जलद वाढ होत आहे. सध्या औद्योगिक क्रांती वाढ झपाट्याने होत असतांना उच्च शिक्षण मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. प्रगत राष्टांमधील तंत्रज्ञानच्या तुलनेत खूप मागे असून कुशल आणि अत्यधुनिक तंत्रज्ञानाच्या मोठ्या प्रमाणावर मागणी आहे.

निष्कर्ष –

प्रस्तूत शोधनिबंधाच्या अध्ययनातून स्पष्ट होते की, उच्च शिक्षण शाश्वत विकास साध्य करण्यासाठी एक महत्त्वाची माध्यम आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये शाश्वत विकास विषयांचा समावेश केल्याने विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील तात्त्विक आणि व्यावहारिक ज्ञान प्राप्ती होत असते. ह्यातून सामजिक दृष्टया समस्या सोडवण्याचे ज्ञान, कौशल्य, आणि तंत्रज्ञान तसेच पर्यावरण सामाजिक जबाबदारी, आणि आर्थिक धारणा करण्याची

आवश्यकता आहे भारतासह जागतिक स्तरावर शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांसाठी जागरूकता व शैक्षणिक उद्दिष्टांसाठी नाही, तर समाजाच्या दीर्घकालीन भविष्यासाठी समाजाच्या दीर्घकालीन भविष्यासाठी महत्वाची भूमिका पार पडणे,ही मुख्य:ता गरज आहे.

शाश्वत विकास हा समाज, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेच्या संतुलनावर आधारित दीर्घकालीन विकासाचे साधन ओळखलेले जाते. शिक्षणाद्वारे व्यक्तींमध्ये सामाजिक, पर्यावरणीय आणि आर्थिक घटकांविषयी सखोल माहिती उपलब्ध होत असते.जागतिक स्तरावर शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांसाठी शिक्षित आणि संवेदनशील सामजिक सजगता निर्माण होण्याची गरज आहे. भारतासारख्या देशात लोकसंख्या आणि संसाधनांचा ताण जास्त आहे, तेथे उच्च शिक्षण हे केवळ ज्ञान कौशल्य व तंत्रज्ञानाच उपयोग करून समाजातील प्रत्येक घटकावर सकारात्मक बदल घडविणे अपेक्षित आहे.

संदर्भ -

-शिक्षणात संगणक आणि महिती तंत्रविज्ञान पुणे धारणकर माधवी, बर्वे मीनाक्षी
-पर्यावरण शिक्षण अहिरराव वा. र . (२००५)
-'Handbook of Digital Higher Education (Nashik)
- शिक्षणासाठी तंत्रज्ञानाची निवड एच. पेराटन ओ जर्नल ऑफ एज्युकेशनल मीडिय
- तंत्रज्ञान शाश्वत हे विकासासाठी डॉ व्ही. एन. शिंदे
- Education For Sustainable Development Prof. Kirti Chitte Nashik .